सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १८६ | रविवार, दि. २९ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. मयूर बिऱ्हाडे
अमळनेर



श्री. प्रवीण वाघ
जी. एस. हायस्कूल, अमळनेर



श्री. निलेश भट
सेवेकरी : श्री मंगळग्रह मंदिर

## माहेरची साडी फेम, ज्येष्ठ अभिनेत्री अलकाताई कुबल आज अमळनेरात


### पोदार लर्न स्कूलतर्फे आयोजित महिलांसाठीच्या वेशभूषा स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्यास उपस्थित राहणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नुकतेच उद्‌घाटन झालेल्या येथील गलवाडे रोडवरील पोदार लर्न स्कूलने सामाजिक जाणिवेचे भान राखत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या या शाळेची यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठीची प्रवेश प्रक्रियाही सुरू झाली आहे.

शनिवार, दि. २८ मार्च रोजी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात गट क्रमांक १ (नर्सरी ते इयत्ता १ ली) साठी रंगभरण स्पर्धा, तर गट क्रमांक २ (इयत्ता २ री ते ५ वी) साठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्यास सायकल,

पान २ वर



### महिलांना मिळणार आज नथ, छल्ला, पैठणी जिंकण्याची संधी

रविवार, दि. २९ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता महिलांसाठी आयोजित ‘मी आई जिजाऊ’ या विषयावरील वेशभूषा स्पर्धेत उत्कृष्ट वेशभूषा सादर करणाऱ्यांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्या निवडण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक– सोन्याची नथ, द्वितीय– चांदीचा छल्ला, तर तृतीय पारितोषिक म्हणून पैठणी दिली जाणार आहे. स्पर्धा आटोपल्यानंतर सायंकाळी दोन्ही दिवस झालेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार आहे. या सोहळ्यास अमळनेरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन पोदार लर्न स्कूलच्या चेअरमन सौ. अर्चनाताई सूर्यवंशी, संचालक प्रशांत सूर्यवंशी व पी. आर. वाघ यांनी केले आहे.

## अमलेश्वरनगरात गोळीबार; खुनाचा गुन्हा दाखल

### आरोपी भूषण महाजनला २ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील अमलेश्वरनगर परिसरात शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी रात्री सव्वानऊच्या सुमारास झालेल्या गोळीबार प्रकरणी अरुण सुरेश महाजन यांचा मृत्यू झाला होता. यासंदर्भात त्यांचा मित्र भूषण देविदास महाजन यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर पहाटेच्या सुमारास पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की मृत अरुण महाजन यांचा भाऊ नरेंद्र महाजन यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात या घटनेसंदर्भात मध्यरात्री फिर्याद दिली होती. त्यात अरुण महाजन यांनी २७ मार्च रोजी रात्री सव्वानऊच्या



सुमारास पत्नीला रुग्णालयात उपचारार्थ नेले होते. तेथून चालत येत असताना ते मित्र भूषण महाजन यांच्या घरी गेले. काही वेळानंतर भूषणचा फोन आला, की अरुण यांना चक्कर आल्याने ते पडल्याचे सांगण्यात आले.

मात्र, घटनास्थळी पोहोचल्यावर उपस्थित लोकांनी अरुण यांच्यावर भूषण महाजन यांनी गोळीबार केल्याचे सांगितले. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रवींद्र पिंगळे, पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड, शरद काकळीज, हवालदार चंद्रकांत पाटील यांच्यासह पोलीस पथक व फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी भूषण महाजन यांच्या घराची झडती घेऊन काही नमुने तपासासाठी जप्त केले. या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक काकळीज पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, आरोपी भूषण महाजनला न्यायालयात हजर केले असता त्यास २ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## दै. ‘ग्लोबल महातेज’चे मुख्य उपसंपादक योगेश महाजन यांचे दु:खद निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील ज्येष्ठ पत्रकार, दै. ‘सकाळ’चे माजी उपसंपादक तथा दै. ‘ग्लोबल महातेज’चे मुख्य उपसंपादक व धडाडीचे, अभ्यासू आणि निडर पत्रकार योगेश अशोकराव महाजन (वय ४७, रा. त्रिकोणी बगीच्याजवळ, वाघ बिल्डिंग, अमळनेर) यांचे शनिवार, २८ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. त्यांच्यामागे, पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील व भाऊ असा परिवार आहे.

अमळनेरच्या पत्रकारितेच्या विश्वात साधारणपणे सन २००२ पासून स्वत:ची वेगळी ओळख



निर्माण करणारे, लेखणीच्या बळावर समाजातील प्रश्नांना वाचा फोडणारे, मितभाषी पण अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेले योगेश महाजन यांचे निधन ही अतिशय दु:खद घटना आहे. त्यांची लेखणी केवळ बातमीपुरती मर्यादित नव्हती, तर ती समाजाला विचार करायला लावणारी, सत्य उजेडात आणणारी आणि सामान्यांच्या भावनांना शब्द देणारी होती.

कोणत्याही विषयावर सखोल अभ्यास करून स्पष्ट आणि ठाम मांडणी करण्याची त्यांची शैली हीच त्यांची खरी ओळख होती. पत्रकारितेतील त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांनी नेहमीच सत्याच्या बाजूने उभे राहत निर्भीडपणे आपले कर्तव्य पार पाडले. त्यांच्यावर सायंकाळी ५.४५ वाजता चोपडा रस्त्यावरील स्मशानभूमीत अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार तसेच संघटना, संस्थांतील कर्मचारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांना दै. ‘ग्लोबल महातेज’ परिवार, मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर तसेच ‘व्हॉईस ऑफ मीडिया’तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली...!




## संपादकीय

# कणाकणाने मृत्यूकडे...

प्रदूषणाने निर्माण केलेल्या आरोग्य समस्यांमुळे देशातील सरासरी आयुर्मानसुद्धा पाच वर्षांनी घटल्याचे काही अभ्यास कानीकपाळी ओरडून सांगत असले, तरी सरकार व नागरिकांचेही डोळे उघडण्यास त्यांना अद्याप यश आलेले नाही, हे दुर्दैव! जगभरात सर्वाधिक हवाप्रदूषण असलेल्या देशांच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक सहावा असल्याचा निष्कर्ष देशातील शहरांच्या घुसमटलेल्या वस्तुस्थितीचा निदर्शक आहे. 'आय क्यू एअर' या स्विस कंपनीने सादर केलेल्या सन २०२५ च्या जागतिक हवा गुणवत्ता अहवालामध्ये जागतिक क्रमवारीत भारत तिसऱ्या स्थानावरून सहाव्या स्थानावर घसरल्याचा आनंद मानायचा, की जगातील तिसरी अर्थव्यवस्था होऊ पाहणाऱ्या महासत्तेला पाकिस्तान, बांगलादेश, ताजिकिस्तान, चाड आणि काँगो अशा देशांच्या पंक्तीत बसवल्याचा खेद; हे ज्याचे त्याने ठरवावे. पर्यावरण आणि आरोग्यासाठी सर्वाधिक घातक असलेल्या अतिसूक्ष्म धूलिकणांचे (पीएम २.५) भारतातील प्रमाण हे जागतिक आरोग्य संघटनेच्या मापदंडापेक्षा दहा पट अधिक आहे, जगातील सर्वांत प्रदूषित शहरांमध्ये भारत, पाकिस्तान आणि चीनमधील अनेक शहरे आहेत आणि गेल्या तीन वर्षांतील तुलनेने स्वच्छ हवा असली, तरी प्रदूषणाच्या प्रमाणात जगातील पहिल्या दहा देशांमधील आपले स्थान कायम आहे.

हवेचे प्रदूषण, हा फक्त हिवाळ्यात कोंडलेल्या दिल्लीच्या वार्ता ऐकण्यापुरता विषय राहिलेला नसून घरादारांत, रस्त्यारस्त्यांवर आणि खेडोपाडीसुद्धा नाकातोंडात शिरणारी धूळ, हे प्रत्येकाच्या अनुभवास येणारे वास्तव ठरले आहे. त्याचेच प्रतिबिंब या जागतिक अहवालात पुन्हा एकदा उमटले आहे. कोरोनामुळे सारे जग थांबल्याचा काळ सोडला, तर धूलिकणांने होणाऱ्या प्रदूषणाचा आलेख सतत धोकादायक पातळीवरच दिसतो. वाढते शहरीकरण, जीवघेणा धूर सोडणारी वाहने, ठिकठिकाणी सुरू असलेली बांधकामे–विकासकामे आणि त्यातून निर्माण होणारी धूळ आणि सिमेंटचे कण, जागोजागी साठणाऱ्या आणि जाळल्या जाणाऱ्या कचऱ्यातून होणारे प्रदूषण, कारखान्यांची धुराडी, शेतीत जाळले जाणारे पाचट आणि वीजकेंद्रांसह ठिकठिकाणी कोळशाचे ज्वलन, ही त्यामागील प्रमुख कारणे सर्वज्ञात आहेत. यंदाच्या या अहवालात उत्तर प्रदेशातील लोनी आणि आसाममधील बर्निहाट ही शहरे देशात सर्वाधिक प्रदूषित असल्याचे समोर आले आहे. सोबतच महाराष्ट्रातील सांगली, महाड, सोलापूर, जळगाव, मालेगाव आणि बेलापूरसारख्या शहरांतील 'पीएम २.५' चे प्रमाण धोकादायक असल्याचे हा अहवाल सांगतो. पुण्या–मुंबईत दररोज सिमेंटचेच श्वास घेणाऱ्या नागरिकांना तर अशा अहवालांचेही नवल नाही. देशातील हवा प्रदूषणामध्ये वाहनांचा वाटा २५ ते ३० टक्के, उद्योगांचा २० ते २५ टक्के, वीजनिर्मिती केंद्रांचा वाटा १५ ते २० टक्के असून कचरा जाळण्यामुळे होणारे हवेचे प्रदूषण १० ते २० टक्के आहे. हवेचे प्रदूषण ही केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नसून, आरोग्यापुढील सर्वांत मोठ्या संकटांमध्ये त्याने स्थान मिळवले आहे.

या विषारी हवेमुळे रक्तदाब, हृदयरोग, पक्षाघात, श्वसनमार्गातील निरनिराळे संसर्ग, मधुमेह, फुप्फुसांचे विकार आणि कर्करोगाच्या रुग्णांची संख्या वाढली असून, दर वर्षी काही लाख नागरिकांच्या अकाली मृत्यूस ते कारण ठरले आहे. प्रमुख शहरांमधील हवेचे प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' हाती घेण्यात आला; मात्र यथातथा अंमलबजावणीमुळे त्यातून फारसे काही हाती लागलेले नाही. या कार्यक्रमाअंतर्गत मुंबई–पुण्यासारख्या प्रमुख शहरांवरच लक्ष केंद्रित करण्यात येते. अन्य शहरांची निधी मिळवतानाही दमछाक होते. अनेक शहरांत त्या निधीचा वापरच होत नाही; झाला तरी झाडलोट–पाणी फवारण्यासारख्या कामचलाऊ उपाययोजनांसाठी होतो, असे आढळते. वाहनांचे प्रदूषण रोखणे किंवा औद्योगिक प्रदूषणाच्या कडक नियमांची अंमलबजावणी अशा मूळ उपाययोजनांकडे होणारा काणाडोळा, ही सर्वांत मोठी अडचण आहे. दीर्घकालीन उद्दिष्ट म्हणून भारताने सन २०७० पर्यंत 'नेट झिरो'ची घोषणा केली आहे. त्यानुसार शाश्वत ऊर्जास्त्रोतांचा वापर वाढवणे, बॅटरी वाहनांना प्रोत्साहन या दिशेने वाटचाल सुरू आहे; मात्र सौरऊर्जेच्या निर्मितीतील वाढ आणि कोळशाचा वापर ३ टक्क्यांनी घटविण्यात यश असले, तरी आजही देशातील ७० टक्के वीजवापर हा कोळशावरच आधारित आहे. एका रात्रीत चित्र बदलणार नाही. ऊर्जासुरक्षा, गरीबी निर्मूलन , आर्थिक वाढ आणि प्रदूषण नियंत्रण अशा गुंतागुंतीच्या प्रश्नांमधून संतुलित पद्धतीने मार्ग काढावा लागेल. मात्र, या उपाययोजनांची गती वाढली नाही, तर 'पीएम २.५' च्या कणाकणाने आपण मृत्यूच्या अधिक निकट निघालो आहोत, या वास्तवाची जाणीव ठेवलेली बरी.



*अमळनेर : पोदार लर्न स्कूलतर्फे शुक्रवारी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेस उपस्थित चेअरमन सौ.अर्चनाताई सूर्यवंशी. शेजारी संचालक प्रशांत सूर्यवंशी व पी. आर. वाघ.*

## अलकाताई कुबल आज अमळनेरात

पान १ वरून

द्वितीय– एज्युकेशनल लॅपटॉप, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास एज्युकेशनल किट देण्यात येणार आहे. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. त्याचप्रमाणे लकी ड्रॉच्या माध्यमातून ५ विजेत्या विद्यार्थ्यांना विमान प्रवासाची संधीही दिली जाणार आहे. मात्र, एवढ्यावरच न थांबता
रविवार, दि. २९ मार्च रोजी महिलांसाठी 'मी आई जिजाऊ' या विषयावर वेशभूषा स्पर्धेचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी माहेरची साडी फेम ज्येष्ठ अभिनेत्री अलकाताई कुबल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती पोदार लर्न स्कूलच्या चेअरमन सौ.अर्चनाताई सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. यावेळी संचालक प्रशांत सूर्यवंशी व पी. आर. वाघ उपस्थित होते.

# वडिलांची अखेरची इच्छा मुलाकडून मरणोत्तर पूर्ण

## भक्ती आणि श्रद्धेपोटी ४५ महिलांना घडवले मोफत सप्तशृंगी गडाचे दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वडिलांचे वय ७० वर्षे. दोन्ही किडन्या फेल. अंथरुणाला खिळलेले. तशातच वडिलांनी सप्तशृंगी गडावर देवीला जाण्याची इच्छा व्यक्त केली. शाळेच्या कामातून वेळ काढून वडिलांना गडावर नेऊ, असे सांगणाऱ्या शिक्षकाच्या नशिबी दुर्दैव आले. वडिलांचे अकाली निधन झाल्याने इच्छा अपूर्णच राहिली. त्यामुळे मुलाने नंतर गावातील ४५ महिलांना सप्तशृंगी गडावर नेऊन त्यांचे दर्शन घडविले.

गंगापुरी (ता. अमळनेर) येथील भीमराव किसन रामोसे यांच्या दोन्ही किडन्या फेल झाल्यामुळे ते अंथरुणाला खिळून मृत्यूशी झुंज देत होते. अखेरच्या क्षणी त्यांनी मुलगा पत्रकार तथा शिक्षक महेंद्र रामोसे यांच्याजवळ सप्तशृंगी गडावर जाऊन देवीचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली. हे ऐकून मुलाचे डोळे पाणावले. आपल्या जन्मदात्याची अखेरची इच्छा पूर्ण करू, शाळेच्या कामामुळे सुटीच्या दिवशी वडिलांना घेऊन जाऊ, असे ठरले. मात्र, तत्पूर्वीच वडिलांनी प्राण सोडले. वडिलांची अखेरची इच्छा पूर्ण करू शकलो नाही, ही बाब रामोसे यांना सतत मनाला बोचत होती. अखेर त्यांनी ठरवले, की वडिलांना नेऊ शकलो नाही म्हणून सर्व धार्मिक विधी कार्य आटोपल्यावर त्यांनी आपल्या आईसोबत गावातील ४५ महिलांना स्वखर्चाने गडावर नेऊन देवीचे दर्शन घडविले. भक्ती आणि श्रद्धा कोणत्याही मार्गाने पूर्ण करता येते. गावातील महिलांकडून रामोसे यांनी अशा पद्धतीने आपल्या वडिलांची अखेरची इच्छा पूर्ण केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आहे.



*अमळनेर : तालुक्यातील गंगापुरी येथून वडिलांची अखेरची इच्छा पूर्ण करण्यासाठी गावातील महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून नेताना पत्रकार महेंद्र रामोसे. शेजारी ग्रामस्थ.*

# ऐंशी फुटी रिंग रोडला पाणीटंचाई झळ

## ठेकेदाराचे कोट्यवधी रुपयांच्या कामाकडे दुर्लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराला जोडणाऱ्या रिंग रोडचे काम काही दिवसांपासून सुरू आहे. मात्र, कोट्यवधी रुपये खर्चाच्या या कामाकडे ठेकेदाराचे दुर्लक्ष व पाणीटंचाईची झळ बसत असल्याचा आरोप शहरवासीयांकडून केला जात आहे.

सध्य:स्थितीत रिंग रोडवर मध्यभागी गतिरोधक बनविण्याचे काम प्रसादनगर ते मुंदडा गेटपर्यंत सुरू आहे. सुरूवातीपासूनच वादात्मक ठरलेला हा रस्ता ठेकेदाराने कामात गुणवत्ता न ठेवल्याने पूर्णत्वास येणे कठीण बनले आहे.

रस्त्याच्या मध्यभागी गतिरोधक टाकण्याचे काम सुरू असून, या कामावर थेंबभरही पाणी मारले नसल्याचे दिसून आले आहे. आजूबाजूला रहिवासासाठी असलेल्या नागरिकांनी या रस्त्याच्या कामाला पाणीटंचाईच्या झळा बसत असून जबाबदार अधिकारी, लोकप्रतिनिधी यांचेही याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे.

रस्त्याचे काम सुरू असताना याची झळ रहिवाशांना गेल्या वर्षभरापासून बसत आहे. गतिरोधकाचे काम सुरू असताना वाळूही कामाच्या सोयीनुसार टाकली जात आहे. हा प्रकार म्हणजे आबालवृद्धांच्या जीवाशी खेळण्याचा म्हटले जात आहे. मुंदडानगर गेट क्र. १ जवळील रस्त्यावर ज्या ठिकाणी रस्ता एकीकडून दुसरीकडे जातो त्याच ठिकाणी वाळू टाकल्याने मागील आठवड्यात लहान–मोठे अपघातही झाले आहेत. तर कॉलनीतील रस्ता खाली अन् ऐंशी फुटी रस्ता वर अशा स्थितीमुळे या दोन रस्त्यांना जोडणाऱ्या या भागाला याच रस्त्यावर वापरलेली सिमेंट खडी, वाळू टाकून व्यवस्थित उतार करणे गरजेचे असताना ते झालेले नाही. त्यामुळे लोकांचे हाल होत आहेत.



*अमळनेर : शहराला जोडणाऱ्या रिंग रोडचे काम काही दिवसांपासून सुरू आहे. मात्र, कोट्यवधी रुपये खर्चाच्या या कामाकडे ठेकेदाराचे दुर्लक्ष झाल्याने त्याला पाणीटंचाईची झळ बसत असल्याचे दिसून येत आहे.*

### कामाची गुणवत्ता तपासावी

या कामावर सुरूवातीपासून पाणी पाहिजे त्या प्रमाणात मारलेच गेलेले नाही. त्यामुळे या कामाची गुणवता ढासळलेली आहे. आता होत असलेल्या गतिरोधकावर तर पाणीच मारले नसल्याने या उन्हाच्या कडाक्यात हे कोट्यवधी रुपयांचे काम मातीमोल झाले आहे. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर या कामाची चौकशी होऊन त्याची गुणवत्ता तपासली जावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# पॅरोलवर असलेल्या कैद्याला अमळनेर पोलिसांनी पकडले

## सुरतमधील लाजपोर सेंट्रल कारागृहात पुन्हा रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला आरोपी पॅरोलवर सुटल्यानंतर एका व्यापाऱ्याची जागा बळकावण्याचा प्रयत्न करत असल्याची धक्कादायक घटना अमळनेर येथे उघडकीस आली.

या प्रकरणात अमळनेर पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला शिताफीने पकडले. त्यानंतर त्याला पुन्हा सुरत येथील लाजपोर सेंट्रल कारागृहात रवाना केले आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले, की कैलास नवघरे या आरोपीवर अमळनेर येथे खून, दहशत, खंडणी, जबरी चोरी व रस्ता लूट यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

गुजरातमधील एका व्यापाऱ्याच्या खून प्रकरणात त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. न्यायालयाने २७ फेब्रुवारी रोजी त्याला पॅरोलवर सोडले होते. मात्र, ४ मार्च रोजी पॅरोलची मुदत संपल्यानंतरही तो कारागृहात परतलेला नव्हता. दरम्यान, नवघरे याने एका स्थानिक व्यापाऱ्याला जागा स्वत:ची असल्याचा दावा करत ती ताब्यात देण्याची अथवा दोन कोटी रुपये देण्यासंदर्भात धमकी दिली. या प्रकाराची माहिती व्यापाऱ्याने पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना दिली. पोलिसांनी लेखी तक्रार देण्यास सांगितले असता दहशतीपोटी सदर व्यापाऱ्याने असमर्थता दर्शविली. मात्र, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक निकम यांनी उपनिरीक्षक समाधान गायकवाड, शरद काकळीज तसेच इतर कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून संबंधितावर कारवाई केली. पथकाने नवघरेच्या घराला घेराव घातला असता घराचे दोन्ही दरवाजे बंद आढळले. पोलिसांनी पहारा ठेवत आवाज दिला असता आरोपीने लहान खिडकीतून पळण्याचा प्रयत्न केला. मात्र अपयशी ठरल्यावर तो पुन्हा घरात लपला. पोलिसांनी दरवाजा उघडून घराची तपासणी केली असता नवघरे शौचालयाच्या वरच्या कोपऱ्यातील अरुंद जागेत लपून बसल्याचे आढळले. त्याला ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्याला तत्काळ सुरत येथील लाजपोर सेंट्रल कारागृहात रवाना केले. विशेष म्हणजे यापूर्वीही पॅरोलवर सुटल्यानंतर नवघरे याने वाहन लुटण्याचा प्रयत्न केल्याची नोंद आहे.

# सोने आणखी किती स्वस्त होणार?

## आताच खरेदी की आणखी स्वस्त होण्याची वाट पाहायची; ग्राहकांची स्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मार्च महिन्यात सोने आणि चांदीच्या दरावर मोठा दबाव पाहावयास मिळाला आहे. केडिया कमोडिटी रिसर्चच्या अहवालानुसार या कालावधीत सोन्याच्या दरात सुमारे १९.५ टक्के इतकी मोठी घसरण नोंदविली गेली आहे. ही मागील ५० वर्षांतील सर्वांत मोठ्या घसरणींमध्ये गणली जात आहे. चांदीच्या दरातही कमजोरी कायम राहिली असून, दोन्ही धातूंमध्ये सातत्याने विक्रीचा दबाव दिसून आला. यामागे गुंतवणूकदारांनी 'ईटीएफ'मधून पैसे काढणे आणि नफा वसुली करणे हे मुख्य कारण ठरले आहे.

**घसरणीची प्रमुख कारणे**

अहवालानुसार या घसरणीमागे अनेक महत्त्वाचे मॅक्रो–इकॉनॉमिक घटक कारणीभूत आहेत. यात 'ईटीएफ' आउटफ्लो, मजबूत डॉलर आणि वाढणारे बॉन्ड यील्ड्स यांचा समावेश आहे. तसेच अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या कडक धोरणामुळेही दबाव वाढला आहे. २०२६ मध्ये व्याजदर कपातीच्या अपेक्षा कमी झाल्या असून, दरवाढीच्या चर्चाही सुरू आहेत. त्यामुळे सोने आणि चांदीसारख्या non-yielding assets चे आकर्षण कमी होत आहे.

**दर किती खाली जाऊ शकतात?**

अहवालानुसार आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्यासाठी ४,००० डॉलर हा महत्त्वाचा सपोर्ट स्तर असून ३,४५० डॉलर हा मजबूत सपोर्ट मानला जातो. तर ५,१८० हा डॉलर रेजिस्टन्स स्तर आहे. देशांतर्गत बाजारात सोन्यासाठी एक लाख १५ हजार ते एक लाख २० हजारांदरम्यान सपोर्ट असून, एक लाख ५० हजारांच्या आसपास रेजिस्टन्स आहे. त्यामुळे घसरण वाढल्यास सोने एक लाख २० हजारांपर्यंत येऊ शकते. मात्र, त्यापेक्षा खाली जाण्याची शक्यता सध्या कमी मानली जात आहे. चांदीच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय बाजारात ५२ डॉलर हा सपोर्ट आणि ८५ डॉलर हा रेजिस्टन्स आहे. देशांतर्गत बाजारात चांदीसाठी एक लाख ७५ हजार सपोर्ट, तर दोन लाख ७५ हजार रेजिस्टन्स मानला जात आहे.

**गोल्ड–सिल्वर रेश्योचा संकेत**

अहवालात असेही नमूद केले आहे, की गोल्ड–सिल्वर रेश्यो ६५ वरून वाढून ७,०७५ पर्यंत जाऊ शकतो. याचा अर्थ येत्या काळात चांदीची कामगिरी सोन्याच्या तुलनेत कमजोर राहण्याची शक्यता आहे.

# सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत घरीच थांबा!

## महाराष्ट्रावर पुन्हा संकट; २४ तासांसाठी हवामान खात्याकडून अलर्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील हवामानात मोठे बदल जाणवत आहेत. आणखी पुन्हा कमाल तापमानाचा पारा चाळीशी पार जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात मार्चच्या शेवटच्या टप्प्यात उष्णता मोठ्या प्रमाणात वाढली असून, गेल्या काही दिवसांत राज्यात उष्णतेच्या लाटेसोबत अवकाळी संकटही घोंघावत आहे. मात्र, आता मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यातील पावसाचा जोर कमी होईल. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागांत कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे. कमाल तापमान सामान्यपेक्षा किंचित जास्त राहील, तर कोकण किनारपट्टीवर उष्ण आणि दमट हवामान जाणवेल, अशी शक्यता हवामानतज्ज्ञांनी वर्तविली आहे.

कोकणात मुख्यत्वे कोरडे ते अंशतः ढगाळ हवामान राहील. उष्ण आणि दमट स्थिती असली तरी हवामानाचा कोणताही अलर्ट नाही. मुंबईसह ठाणे, रायगड परिसरात कमाल तापमान ३४ ते ३६ अंश सेल्सिअसवर जाण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसाची शक्यता नाही. परंतु, उकाडा हैराण करेल.

उत्तर महाराष्ट्रात देखील हवामान मुख्यतः कोरडे आणि निरभ्र राहील. तुरळक ठिकाणी अंशतः ढगाळ राहू शकते, पण पावसाची शक्यता नाही. नाशिकसह, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहमदनगरमध्ये कमाल तापमान ३६ ते ४० अंशांच्या दरम्यान राहील. काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेसारखी स्थिती राहील.

मध्य महाराष्ट्रावरील अवकाळी संकटाची तीव्रता कमी झाली आहे. मध्य महाराष्ट्रातील पुण्यासह सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आदी जिल्ह्यांत हवापालट होईल. हवामान मुख्यतः कोरडे राहील. कमाल तापमान ३५ ते ३८ अंश सेल्सिअस राहील. काही ठिकाणी तुरळक वादळ आणि गारपीट स्थिती असेल. त्यामुळे सोमवार, दि. ३० मार्च २०२६ पर्यंत मराठवाड्याच्या हवामानात मोठे बदल जाणवतील. छत्रपती संभाजीनगरसह सर्वच जिल्ह्यांत हवामान कोरडे राहील. कमाल तापमान ३७ ते ४० अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांत अवकाळी संकटाचा मोठा फटका बसला होता. परंतु ३० मार्च २०२६ पर्यंत अवकाळीचा धोका कमी राहील. पावसाचा कोणताही इशारा नाही.

महाराष्ट्रातून अवकाळीचा धोका कमी झाला आहे. मात्र विदर्भात संकट कायम आहे. नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस होईल. हवामान विभागाने या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. तर तापमानाचा पारा चढणार असून कमाल तापमान ३८ ते ४१ अंशांवर जाईल. अकोल्यात सर्वोच्च तापमानाची नोंद होईल.

दरम्यान, राज्यात येत्या दोन दिवसांत कमाल तापमानाचा पारा २ ते ४ अंशांनी वाढण्याची शक्यता आहे. विदर्भ वगळता इतर भागात अवकाळी संकटाचा धोका कमी झाला आहे. परंतु वाढत्या तापमानामुळे सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत बाहेर जाणे टाळावे लागेल. तसेच आरोग्याची काळजी घ्यावी लागेल.

॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



स्व. योगेश अशोकराव महाजन
मृत्यू : शनिवार, दि. २८ मार्च २०२६
शोकाकुल
सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
ग्लोबल महातेज परिवार, अमळनेर
मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर
व्हॉईस ऑफ मीडिया, अमळनेर
श्री मंगलग्रह मंदिर अमळनेर
VOICE OF MEDIA

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# पाण्यातील शहर व्हेनिस

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

व्हेनिस हे पाण्यातील शहर म्हणून ओळखले जाते. व्हेनिसप्रमाणे जगात अशी पाण्यातील काही शहरे आहेत. बेल्जियममधील ब्रुजेस हे शहर उत्तरेचे व्हेनिस म्हणून ओळखले जाते. तर थायलंडमधील बँकॉक या शहराला आशियाचे व्हेनिस म्हणून ओळखले जाते. व्हेनिसप्रमाणे ॲमस्टरडॅम हे शहर नव्वद छोट्या बेटांवर उभे आहे. या शहरातील कालव्यांचे जाळे एखाद्या कोळ्याच्या जाळ्याप्रमाणेच असल्याचे सांगितले जाते. या कालव्यांच्या किनाऱ्यावर स्थानिक व्यापाऱ्यांनी घरे बांधली आहेत.

ब्रुजेस या शहरातही कालव्यांच्या कडेला नितांत सुंदर घरे बांधण्यात आलेली आहेत.

अभ्यासकांच्या मते व्हेनिस शहराची स्थापना पाचव्या ते सातव्या शतकांमध्ये झाली असावी. या कालावधीत उत्तरेकडील रानटी जमातीच्या लोकांनी मुख्य भूप्रदेशातील शहरांवर आक्रमण केले व बरीच नासधूस व लुटालूट केली. लुटारूंना घाबरून पळालेल्या लोकांपैकी अनेक जणांनी सरोवराच्या आसपासच्या द्वीपांचा आश्रय घेतला. ही द्वीपे कोणत्याही दृष्टीने सोयीस्कर नसली तरीसुद्धा ती निदान सुरक्षित होती. इतिहासकालीन दस्तावेजांवरून आणि नोंदीमधून असे ध्वनित होते, की अगदी सुरूवातीला येथे जी घरे बांधण्यात आली त्याकरिता आधी चिखलात मोठमोठे खांब ठेवून त्यावर अधूनमधून झाडाच्या पातळ फांद्या व वेत पसरून पाया तयार केला जात व त्यावर बाधकाम करण्यात येत असे. कालांतराने व्हेनिसच्या रहिवाशांनी हजारो लाकडांच्या ढिगाऱ्यावर पाया तयार करून त्यावर दगडी बांधकाम करण्यास सुरूवात केली. दरम्यान, सरोवरातील रियाल्टोची द्वीपे जी शहराचा प्रमुख भाग बनणार होती ती सहसा पाण्याने मरून जायची. त्यामुळे येथील जमीन पक्की नसून वसाहती स्थापन करण्याइतकी मोठीही नव्हती. यावर एकच उपाय होता, तो म्हणजे ओली जमीन कोरडी करून समुद्राच्या जागेवर विस्तारित निर्माण करणे, येथील रहिवाशांनी आपल्या बोटींकरता कालवे काढले आणि द्वीपांलगतच्या जमिनीत भर घालून पाण्याखालील जमीन पाया बांधकामाकरिता संपादन केली. हे कालवेच या शहरातील रस्ते बनले आणि पायी चालणाऱ्या लोकांना एका बेटावरून दुसऱ्या बेटावर जाता यावे यासाठी पूल बांधण्यात आले.



# जगातील पहिले युद्ध

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पहिले आणि दुसरे महायुद्ध तसेच शिवाजी, पेशवे, राणा प्रताप यांची मोघल आणि ब्रिटिशांशी झालेली युद्धे आपल्याला ठाऊक आहेत. पाकिस्तान आणि चीन यांच्याबरोबर झालेली युद्धेही आपण इतिहासाच्या क्रमिक पुस्तकातून वाचली असतील. पृथ्वीवरील माणसांमधील पहिले युद्ध केव्हा झाले असेल याचा शोध घेतल्यानंतर असे दिसून येते, की ख्रिस्तपूर्व २५००-२३०० या काळात पृथ्वीवरील पहिले युद्ध झाले. सुमेरियन आणि सेमीटिक लोक यांच्यात हे युद्ध झाल्याचे इतिहास सांगतो. सेमीटिक लोकांचे साम्राज्य लेबाननपासून पर्शियन आखातापर्यंत पसरले होते. या जमातीतील हमूरबी हा किंग ऑफ बेबिलॉन म्हणून ओळखला जात होता. मेसोपोटॅमियाचा बादशहा झाल्यानंतर त्याचे सुमेरियन सैन्याशी युद्ध झाले.



# दुपारच्या जेवणानंतरची सुस्ती कशी घालवाल?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दुपारच्या जेवणानंतर येणारी सुस्ती अर्थात 'फूड कोमा' घालविण्याचे मुख्यत्वे ८ प्रभावी उपाय आहेत. त्यामुळे सुस्ती सहजपणे घालविली जाते.

१) कार्बोहायड्रेट्सवर नियंत्रण
दुपारी अतिप्रमाणात भात किंवा साखरयुक्त पदार्थ खाल्ल्याने रक्तातील इन्सुलिन वाढते आणि झोप येते. त्यामुळे प्रथिनांचा समावेश वाढवा.

२) पाण्याचे प्रमाण
शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे थकवा जाणवत असल्याने जेवणानंतर पुरेसे पाणी प्यावे. जेणेकरून ऊर्जा टिकून राहते.

३) शंभर पावले चाला
जेवणानंतर लगेच बसून न राहता किमान १० ते १५ मिनिटे संथगतीने चालावे. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि पचन सुलभ होते.

४) न्याहारीवर लक्ष
सकाळी भरपेट नाश्ता केल्यास दुपारी खूप भूक लागत नाही. पर्यायाने जड जेवण टाळले जाते आणि सुस्ती कमी येते.

५) सूर्यप्रकाश घ्या
जेवणानंतर काही वेळ नैसर्गिक उजेडात घालवल्यास शरीरातील 'मेलाटोनिन' (झोपेचे संप्रेरक) कमी होऊन सतर्कता वाढते.

६) लहान डुलकी
जर झोप अनावर होत असेल, तर फक्त १५ ते २० मिनिटांची छोटी डुलकी घ्या; जास्त वेळ झोपल्यास रात्रीची झोप बिघडू शकते.

७) हर्बल टी किंवा कॉफी
जेवणानंतर अर्ध्या तासाने कोमट पाणी किंवा ग्रीन टी घेतल्यास चयापचय क्रिया वेगवान होते.

८) सावधानतेने बसा
कामाच्या ठिकाणी बसताना पाठीचा कणा ताठ ठेवावा; चुकीच्या पद्धतीने बसल्याने शरीराला अधिक थकवा जाणवतो.

**जाणकारांचा सल्ला**
ही झोप नैसर्गिक असली, तरी जर ती दररोज आणि अतिप्रमाणात येत असेल, तर रक्तातील साखरेची तपासणी करणे आवश्यक आहे.

# वॉटर फिल्टरचा शोध

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पिण्याचे पाणी शुद्ध करून देणारे वॉटर फिल्टर आता घराघरांत दिसतात. पिण्याचे पाणी स्वच्छ, शुद्ध करून घेण्याची मानवी परंपरा ही हजारो वर्षांपासूनची आहे. तेव्हापासून पाणी शुद्ध करून घेण्याच्या अनेक पद्धतीही विकसित झालेल्या आहेत. पण पाणी शुद्ध करण्याचे तंत्र सिंधू संस्कृतीतील लोकांनी शोधून काढले, असे साधारण दोन हजार वर्षांपूर्वीच्या संस्कृत ग्रंथामधील उल्लेखांवरून आढळून येते. सुश्रुत संहिता या ग्रंथात पाणी कसे शुद्ध करून घेण्यासंदर्भात काही तंत्रे विस्ताराने सांगितली आहेत. अशुद्ध पाणी अग्नीवर उकळून किंवा सूर्याच्या उष्णतेवर तापवून किंवा गरम लोखंड पाण्यात बुडवून शुद्ध करावे किंवा वाळूमधून गाळून घेऊन, थंड करून पाणी शुद्ध करून घ्यावे, अशा प्रकारची अनेक तंत्रे या संहितेत सांगितली आहेत.


बरे इजिप्शियन लोकांनाही पाणी शुद्ध करण्याचे तंत्र अवगत होते. पण त्या काळात पिण्याचे पाणी शुद्ध करताना आरोग्यापेक्षा त्याची चव आणि दिसण्याकडे अधिक लक्ष दिले जात होते. पाणी शुद्ध करण्याचा आरोग्याशी संबंध आहे, हे एकोणिसाव्या शतकात लक्षात आले. दिसायला स्वच्छ आणि चवीला चांगले असणारे पाणी शुद्ध असतेच, असे नाही. हे लंडनमध्ये १८५५ मध्ये कॉलराची जबरदस्त साथ आली तेव्हा लक्षात आले. त्यावेळी पाण्याच्या स्रोतांचा शोध घेतल्यावर संशोधकांच्या ध्यानात आले, की पाण्यात विरघळणाऱ्या आणि डोळ्यांना न दिसणाऱ्या घातक घटकांमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

# श्रुती हासनकडून मोठा खुलासा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बॉलिवूड आणि टॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करणारी अभिनेत्री श्रुती हासन हिची केवळ ज्येष्ठ अभिनेते कमल हासन यांची मुलगी एवढीच ओळख नसून तिने आपल्या दमदार अभिनयाने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिने आजवर अनेक बिग बजेट चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. तिचा चाहता वर्ग देखील मोठा आहे. तिचे नाव अनेक अभिनेत्यांसोबत जोडले जात आहे. अलीकडील एका मुलाखतीत श्रृतीने याबाबत खुलासा केला आहे.

एका मुलाखतीत श्रुती हासन म्हणाली, की माझे प्रेमजीवन खूप जुने आहे. कधी गाण्यांचे शूटिंग असते, तर कधी चित्रीकरण. जेव्हा मला ब्रेक मिळतो तेव्हा समोरच्या व्यक्तीला त्याचे स्वतःचे आयुष्य जगावे लागते. बघा, आमच्या इंडस्ट्रीत जवळपास प्रत्येकजण असाच आहे. जेव्हा ती प्रेमात असते तेव्हा ती पूर्णपणे घरगुती मुलगी बनते, असे ती म्हणाली. मी माझ्या जोडीदाराला आधी जेवण भरवते, त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करते. त्याला ताप आला तर मी त्याची काळजी घेते. पण मी हे सर्व त्या व्यक्तीसाठी करते, जेणेकरून तो माझ्या भावनांना महत्त्व देईल. असे सांगून ती नेमकी कोणला डेट करत आहे त्याचे नाव गुलदस्त्यात ठेवले आहे.



# तानाजी मालुसरे यांची २६ किलोची तलवार आता कुठे आहे?

## शिवरायांच्या गळ्यातील माळही ठेवली आहे जपून

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

इतिहासातील पानांमध्ये अशा काही वीरगाथा कोरल्या गेल्या आहेत ज्या आजही अंगावर शहारे आणतात. स्वतःच्या मुलाचे लग्न उंबरठ्यावर असताना हातातील अक्षता बाजूला सारून ज्यांनी रणांगणाचे निमंत्रण स्वीकारले तो पराक्रम आजही सह्याद्रीच्या कड्याकड्यांत घुमतोय. 'आधी लगीन कोंढाण्याचे, मग माझ्या रायबाचे' हा अजरामर शब्दोच्चार करत केवळ ३०० मावळ्यांच्या साथीने रात्रीच्या अंधारात काळजाचा थरकाप उडवणारा उभा कडा चढून ज्यांनी अशक्य कोटीतील विजय खेचून आणला त्या अजोड शौर्याने स्वराज्याचा पाया अधिक भक्कम केला.

हा दैदीप्यमान वारसा आजही मालुसरे घराण्याने केवळ स्मृतीतच नव्हे, तर प्रत्यक्ष ऐतिहासिक वस्तूंच्या रूपाने जिवापाड जपला आहे. सुभेदार तानाजी मालुसरे यांची तब्बल २६ किलो वजनाची ती ऐतिहासिक तलवार आजही महाड येथील त्यांच्या निवासस्थानी अत्यंत सन्मानाने ठेवली आहे. ही तलवार पाहताना आजही त्या वेळच्या घनघोर युद्धाची आणि नरवीरांच्या मनगटातील बळाची प्रचिती येते. केवळ शस्त्रच नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःच्या गळ्यातील जी अमूल्य कवड्यांची माळ रायबाच्या लग्नात भेट दिली होती ती आजही मालुसरे कुटुंबाच्या देवघरात सुरक्षित आहे.

कोंढाण्याच्या लढाईत उदयभान राठोडशी दोन हात करताना तानाजींना वीरमरण आले आणि महाराजांच्या मुखातून 'गड आला पण सिंह गेला' हे आर्त उद्गार निघाले. या महान बलिदानानंतर त्यांचे पुत्र रायबाजी मालुसरे यांनी किल्ल्याचे पहिले सुभेदार म्हणून जबाबदारी सांभाळली. रायबाजींची समाधी आजही पारगड किल्ल्यावर असून मालुसरेंच्या तब्बल दहा पिढ्यांनी या गडाची सेवा केली. हा ऐतिहासिक वारसा केवळ कागदावर मर्यादित न राहता पिढ्यानपिढ्या रक्तामध्ये भिनलेला आहे.


काळाच्या ओघात तानाजींचे वंशज व्यवसायानिमित्त बेळगावमधील अनगोळ येथे स्थायिक झाले. घराण्याची अकरावी पिढी बाळकृष्ण मालुसरे यांनी हा वारसा पुढे नेला तर त्यांच्या सुनबाई डॉ. शीतल मालुसरे या देखील हा इतिहास जपण्याचे काम करत आहेत. सध्या तानाजींचे थेट तेरावे वंशज म्हणजे रायबा हे त्यांच्या मूळ गावी महाड येथे वास्तव्यास असून स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या त्या महान सुभेदाराची परंपरा आजही अभिमानाने तेवत ठेवत आहेत.



# पंजाब की बेटी ने बिहार में लाई शिक्षा क्रांति...

## बक्सर की डीसी, पति भी आयएएस अधिकारी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा




पंजाब की बेटी ने बिहार में शिक्षा के क्षेत्र में नई क्रांति ला दी है। पंजाब के जालंधर की रहने वाली आईएएस अधिकारी साहिला हीर अब बिहार के बक्सर में बतौर डीसी नियुक्त की गई हैं। इनके पति भी आईएएस अफसर हैं।

पंजाब स्टेट पॉवर कारपोरेशन लिमिटेड के रिटायर डिप्टी चीफ इंजीनियर बीएल हीर व रिटायर प्रिंसिपल कुलजीत हीर की बेटी साहिला हीर इन दिनों बिहार में छाई हुई हैं और वहां पर तमाम शिक्षा संस्थानों में साहिला के नाम की चर्चा बनी हुई है। दरअसल, साहिला हीर बिहार के प्राथमिक शिक्षा की डायरेक्टर रही हैं और शिक्षा जगत में नए आयाम स्थापित करने के बाद उनको दो दिन पहले बक्सर की डिप्टी कमिश्नर (डीसी) लगाया गया है। हालांकि बिहार के शिक्षा जगत के लोग सरकार पर प्रेशर बना रहे हैं कि साहिला हीर को वापस एजुकेशन सिस्टम में लाया जाए। क्योंकि उन्होंने बतौर डायरेक्टर शिक्षा जगत में न केवल खासे बदलाव किए बल्कि शिक्षा का स्तर ऊंचा उठाने के लिए जमीनी स्तर पर नए कार्य किए।

साहिला हीर जालंधर के शिव विहार की रहने वाली हैं और २०१८ में बतौर आईएएस चुनी गई। साहिला को बिहार कैडर में तैनात किया गया। साहिला जालंधर के एमजीएन स्कूल से पास आउट हैं, जहां पर १२ वीं की कक्षा पास की। इसके बाद साहिला हीर थापर इंस्टीट्यूट पटियाला से इलेक्ट्रॉनिक्स व इंस्ट्रूमेंट कंट्रोल में डिग्री हासिल की। २०१३ में थापर से डिग्री करने के बाद इवेंट मैनेजमेंट में पोस्ट ग्रेजुएशन की और २०१७-१८ में सिविल सर्विस के लिए चुनी गई। इसके बाद उनको बिहार में



ने खोला, जिससे लंबे समय से प्रमोशन की राह देख रहे शिक्षकों में नई ऊर्जा का संचार हुआ और नई भर्ती शुरू हो गई।

इसके अलावा शिक्षकों की शिकायतों का निपटारा कर एक व्यवस्था लागू कर दी, जिसके बाद शिक्षकों को शिकायत लेकर पटना आने की जरूरत ही नहीं पड़ी और एक भी शिकायत विभाग में लंबित नहीं रही। साहिला हीर बिहार में मीड-डे मील की डायरेक्टर भी रही और सारा सिस्टम चैनलाइज कर दिया और पूरा डाटा रोजाना अपलोड होने लगा, जिससे स्कैंडल रुक गए।

साहिला हीर की मां रिटायर प्रिंसिपल कुलजीत हीर व पिता बीएल हीर का कहना है कि बेटी पर पिछले समय काफी बोझ रहा, दिन रात एक कर उसने बिहार एजुकेशन सिस्टम को एक लाइन पर ला दिया। साहिला हीर के पति नितिन कुमार सिंह भी आईएएस अधिकारी हैं और वह भी २०१८ के आईएएस कैडर से हैं। नितिन कुमार सिंह कैमूर जिले के डीसी हैं। वीरवार को दोनों ने अपने-अपने जिले में पदभार संभाल लिया है।

साहिला हीर की माता कुलजीत हीर का कहना है कि साहिला में स्कूल के समय में गजब की प्रतिभा थी और हमेशा साकारात्मक ऊर्जा को सहेजकर आगे चलती थी। बिहार में जिस तरह से शिक्षक उसकी बेटी साहिला हीर की वापसी की डिमांड कर रहे हैं, उससे उनको गर्व महसूस हो रहा है।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे




# कामदा एकादशी विशेष

# कामदा एकादशी व्रत कथा आणि महत्त्व काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इतर एकादशी तिथींप्रमाणे कामदा एकादशीलाही हिंदू धर्मात खूप महत्त्व आहे. चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला कामदा एकादशी म्हणतात. कामदा एकादशीच्या दिवशी भगवान विष्णू यांची पूजा करण्याची परंपरा आहे. कामदा एकादशीच्या दिवशी भगवान विष्णूची पूजा केल्याने भक्तांना भगवान विष्णूची कृपा प्राप्त होते. या एकादशीच्या दिवशी कामदा एकादशी व्रत कथेचा पाठ करणे आणि तिची कथा श्रवण करणे अत्यंत शुभ मानले जाते. यामुळे भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. या तिथीला फक्त फळे खाऊन कामदा एकादशीचे व्रत केले जाते.

### कामदा एकादशी व्रत कथेचे महत्त्व

युधिष्ठिर भगवान श्रीकृष्णाला म्हणाले, की हे भगवान! मी तुम्हाला पूर्ण सलाम करतो. पापमोचनी एकादशी, चैत्र महिन्याच्या कृष्ण पक्षातील एकादशीबद्दल तुम्ही मला खूप छान आणि तपशीलवार सांगितले. यानंतर मी तुला विनंती करतो – हे माधव! कृपया मला चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीची संपूर्ण माहिती द्या. या एकादशीचे नाव काय? त्याचा नियम काय आहे? हे व्रत केल्याने तुम्हाला कोणते परिणाम मिळतात? पद्धतशीरपणे सर्वकाही समजावून सांगा.

यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले, की हे धर्मराजा युधिष्ठिर! चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला कामदा एकादशी म्हणतात. एकदा हाच प्रश्न राजा दिलीपने महर्षी वशिष्ठ यांना विचारला होता. वशिष्ठ ऋषींनी राजा दिलीपला याविषयी जे काही सांगितले, तेच मी तुला सांगेन.



### कामदा एकादशी व्रत कथा

फार जुन्या काळी भोगीपूर नावाचे राज्य होते. पुंडरिक नावाच्या राजाचे राज्य होते, जो अनेक ऐश्वर्याने परिपूर्ण होता. या राज्यात अनेक अप्सरा, किन्नर आणि गंधर्व राहत होते. त्याच ठिकाणी एका अतिशय आलिशान घरात ललिता आणि ललित नावाची एक स्त्री व पुरुष राहत होते. त्या दोघा पती-पत्नीमध्ये खूप आपुलकी होती. दोघेही बराच काळ एकमेकांपासून वेगळे राहिल्यास दोघांचेही खूप हाल व्हायचे. एके काळी पुंडरिकाच्या मेळाव्यात सर्व गंधर्वांसोबत ललितही गायनाचा कार्यक्रम करत होता. गाताना त्यांना त्यांची लाडकी ललिता आठवली. त्यामुळे त्याचा आवाज खराब झाला, संपूर्ण गाण्याचा फॉर्म बिघडला. कर्कोट नावाच्या सापामध्ये त्याचे स्थान तुटल्यामुळे ललिताच्या भावना जाणून त्याने

राजाला संपूर्ण कथा सांगितली. त्यामुळे राजा पुंडरिका रागाने त्याला म्हणाला, की माझ्यासमोर गाताना तुला तुझ्या पत्नीची आठवण येत आहे. त्यामुळे शिक्षा म्हणून नरभक्षक राक्षस बनून आपल्या कर्माचे फळ भोगावे लागेल. त्याच क्षणी, राजा पुंडरिकाने दिलेल्या शापामुळे ललिताचे रूपांतर अत्यंत भयंकर आणि महाकाय राक्षसात झाले. त्याचा चेहरा अतिशय उग्र होता, त्याचे डोळे सूर्य-चंद्रासारखे तेजस्वी होते आणि तोंडातून अग्नीही बाहेर पडत होता. त्याचे संपूर्ण शरीर पर्वतासारखे विशाल झाले. अशा रीतीने तो राक्षस बनून अनेक प्रकारची दुःखे भोगू लागला. ललितच्या पत्नीला जेव्हा हे कळले तेव्हा तिला खूप वाईट वाटले आणि ती आपल्या पतीला या शापातून मुक्त करण्याचा मार्ग विचार करू लागली. तिच्या राक्षसी पतीला वनात राहून अनेक प्रकारचे दुःख सोसावे लागले. त्याची पत्नी ललिता त्याच्यामागे येऊन शोक करीत होती. एकदा ललिता आपल्या पतीच्या मागे विंध्याचल पर्वतावर पोहोचली. त्या पर्वतावर शृंगी ऋषींचा आश्रम होता. ललिता त्याच्याकडे गेली आणि प्रार्थना करू लागली. त्याला पाहून श्रृंगी ऋषी म्हणाले, की हे उत्तम! तू कोण आहेस आणि इथे का आला आहेस? यावर ललिता म्हणाली, की हे ऋषी! माझे नाव ललिता आहे आणि राजा पुंडरिकाने दिलेल्या शापामुळे माझा पती राक्षस झाला आहे. त्यांच्या उद्धारासाठी कृपया काही उपाय सुचवा. यावर शृंगी ऋषी म्हणाले, की हे कन्या! आता चैत्र शुक्ल एकादशी येणार आहे, जी कामदा एकादशी म्हणून ओळखली जाते. या व्रताचे पालन केल्याने मनुष्याची सर्व कामे सिद्धीस जातात. जर तुम्ही या कामदा एकादशीचे व्रत करून तिचे पुण्य तुमच्या पतीला दिले तर लवकरच तुमच्या पतीला राक्षसी रूपापासून मुक्ती मिळेल.

ऋषींच्या सल्ल्यानुसार ललिताने चैत्र शुक्ल व्रत पाळले आणि द्वादशीच्या दिवशी आपल्या व्रताचे फळ ब्राह्मणांसमोर आपल्या पतीला देऊन ती भगवान विष्णूची प्रार्थना करू लागली, की हे भगवान! मी पाळलेल्या या व्रताचे फळ माझे पती देव यांना मिळो, जेणेकरून ते लवकर या राक्षसापासून मुक्त व्हावे. एकादशीच्या व्रतामुळे तिचा पती राक्षसी रूपातून मुक्त झाला आणि त्यानंतर दोघेही विमानात बसून स्वर्गाकडे निघाले.

## कामदा एकादशी कोणी करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कामदा एकादशीचे व्रत प्रत्येक इच्छुकाने, विशेषतः ज्यांना मनातील इच्छा पूर्ण करायच्या आहेत, पापांतून मुक्ती हवी आहे किंवा नवीन आध्यात्मिक सुरूवात करायची आहे त्यांनी करावे. हे व्रत वय (८ ते मृत्यूपर्यंत), लिंग किंवा जातीचा विचार न करता सर्व भाविक करू शकतात. चैत्र शुक्ल एकादशीला विष्णू व लक्ष्मीची पूजा व उपवास केल्याने सुख-समृद्धी मिळते.

**कामदा एकादशी कोणी करावी?**

**इच्छापूर्तीसाठी :** ज्यांना आपल्या अपूर्ण इच्छा पूर्ण करायच्या आहेत त्यांच्यासाठी हे व्रत उत्तम मानले जाते.

**पापमुक्तीसाठी :** जाणूनबुजून किंवा अजाणतेपणी झालेल्या पापांचे क्षालन करण्यासाठी आणि मानसिक शांततेसाठी हे व्रत केले जाते.

**आध्यात्मिक प्रगती :** नवीन आध्यात्मिक जीवन सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी हे व्रत अत्यंत फलदायी आहे.

**धन-समृद्धीसाठी :** घरात सुख-शांती आणि समृद्धी वाढविण्यासाठी विष्णू व लक्ष्मीची आराधना केली जाते.

**महत्त्वाचे नियम :** उपवास आणि पूजेसोबतच या दिवशी दान करणे (उदा.- अन्नदान, वस्त्रदान, पाणी) खूप शुभ मानले जाते.

चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला सकाळी लवकर उठून स्नान करून विष्णूची पूजा करावी.

दुसऱ्या दिवशी (द्वादशी) शुभ मुहूर्तावर उपवास सोडावा.

# सकाळी उठताच झाडू लावता?






## प्रेमानंद महाराज सांगतात 'ही सवय आजच बदला'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या धावपळीच्या युगात आपण या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो, पण तुम्हाला माहीत आहे का, की प्रेमानंद जी महाराज आणि भारतीय वास्तुशास्त्र या साध्या दिसणाऱ्या झाडूला लक्ष्मीचे रूप का मानतात? आजच्या लेखात आपण याच झाडूशी संबंधित अशा काही गोष्टी जाणून घेणार आहोत, ज्या तुमच्या घराची ऊर्जा आणि समृद्धी बदलू शकतात.

सकाळ झाली की एक काम सर्वांच्या घरात आवर्जून केले जाते ते म्हणजे कचरा काढणे ज्याला आपण झाडू काढणे, असेही म्हणतो. सकाळचा कचरा काही काढला किंवा उशीर झाला तर आई किती रागावते? हे तर आपल्यापैकी सगळ्यांनीच अनुभवले असेल. आईचे म्हणणे असते, की असे केल्याने घरातील वाईट गोष्टी निघून जातात आणि लक्ष्मी येते. पण कधी विचार केलाय का, की याच झाडूवरून आपल्या घरात एवढ्या वाटाघाटी आणि नियम का असतात? 'सायंकाळी झाडू मारू नको', 'झाडूला पाय लावू नको', 'झाडू उभी ठेवू नको'... असे अनेक सल्ले आपण लहानाचे मोठे होताना ऐकले आहेत. आजच्या धावपळीच्या युगात आपण या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो, पण तुम्हाला माहीत आहे का, की प्रेमानंद जी महाराज आणि भारतीय वास्तुशास्त्र या साध्या दिसणाऱ्या झाडूला लक्ष्मीचे रूप का मानतात? आजच्या लेखात आपण याच झाडूशी संबंधित अशा काही गोष्टी जाणून घेणार आहोत, ज्या तुमच्या घराची ऊर्जा आणि समृद्धी बदलू शकतात.

### केवळ स्वच्छतेचे साधन की उर्जेचा स्रोत?

भारतीय परंपरेत झाडूला केवळ कचरा काढण्याचे साधन मानले जात नाही. गावांपासून शहरांपर्यंत आजही झाडूशी संबंधित श्रद्धा सारख्याच आहेत. आधुनिक जीवनशैलीत आपण कदाचित व्हॅक्युम क्लीनर वापरू लागलो असू, पण केरसुणी किंवा 'झाडू'चे महत्त्व कमी झालेले नाही. जुन्या काळात मानले जायचे, की घर स्वच्छ असेल तरच तेथे सकारात्मक उर्जेचा संचार होतो.

### झाडू ठेवण्याची योग्य जागा कोणती?

अनेकांना सवय असते की काम झाले की झाडू दरवाजाच्या मागे किंवा किचनच्या कोपऱ्यात कुठेही ठेवून देतात. पण वास्तूशास्त्रानुसार हे चुकीचे ठरू शकते.

घराच्या उत्तर-पूर्व (ईशान्य) कोपऱ्यात झाडू ठेवल्याने नकारात्मकता वाढते, असे मानले जाते. तर झाडू ठेवण्यासाठी घराची दक्षिण-पश्चिम दिशा सर्वात योग्य मानली जाते.

ज्याप्रमाणे आपण आपले पैसे किंवा दागिने कपाटात लपवून ठेवतो, तसेच झाडू सुद्धा इतरांच्या नजरेस पडणार नाही अशा ठिकाणी ठेवावा, असे प्रेमानंदजी महाराज सांगतात.

### झाडू मारण्याची योग्य वेळ कोणती?

'केव्हाही वेळ मिळाला की झाडू मारला' कधीही सकाळी उठले की झाडू मारणे असं करून चालत नाही. शास्त्रानुसार सूर्योदयानंतर लगेच झाडू मारणे अत्यंत शुभ मानले जाते. कारण यामुळे दिवसाची सुरूवात सकारात्मकतेने होते. त्यामुळे केव्हा ही उठून झाडू मारण्याला अर्थ नाही तर सुर्यदयापूर्वी झाडू मारण्याला महत्व आहे. मात्र, सूर्यास्तानंतर किंवा रात्री झाडू मारणे टाळावे. जर काही कारणास्तव रात्री झाडू मारावा लागलाच, तर तो कचरा रात्रीच घराबाहेर फेकू नका, तो एका कोपऱ्यात गोळा करून ठेवा आणि सकाळी बाहेर टाका.

### तुटलेली झाडू घरात का ठेवू नये?

अनेकदा आपण झाडू पूर्ण झिजेपर्यंत किंवा तुटेपर्यंत वापरतो. पण वास्तू आणि विज्ञान दोन्ही सांगतात की तुटलेली झाडू वापरणे नुकसानकारक आहे. तुटलेली झाडू घरात दारिद्र्य आणते असे मानले जाते. तुटलेल्या झाडूने स्वच्छता नीट होत नाही, उलट धुळीचे कण हवेत उडतात जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे झाडू खराब होताच ती बदलणे हाच व्यावहारिक निर्णय ठरतो.

### झाडू वापरताना टाळाव्यात अशा 'या' ४ चुका

- झाडू कधीही उभी करून ठेवू नका, ती नेहमी आडवी ठेवावी.
- झाडूला लक्ष्मीचे रूप मानले जाते. त्यामुळे चुकून पाय लागल्यास नमस्कार करावा.
- झाडू नेहमी झाकून किंवा लपवून ठेवावी.
- झाडू मारल्यानंतर कचरा घरात जास्त वेळ साठवून ठेवू नका. यामुळे बॅक्टेरिया आणि नकारात्मकता दोन्ही वाढतात.

### परंपरा आणि विज्ञानाचा मेळ

आजची पिढी प्रत्येक गोष्टीमागे तर्क शोधते. झाडूशी संबंधित सर्वच गोष्टी विज्ञानाशी जोडता येणार नाहीत, पण त्यामागे एक शिस्त आणि स्वच्छतेचा विचार नक्कीच आहे. घर नीटनेटके ठेवल्याने मानसिक शांतता मिळते आणि आरोग्यही चांगले राहते. प्रेमानंदजी महाराजांच्या मते, आपल्या सवयीच आपले नशीब घडवतात, आणि स्वच्छतेची सवय ही त्यातली सर्वात पहिली पायरी आहे. झाडूशी संबंधित श्रद्धा तुम्ही मानत असाल किंवा नसाल, पण एक गोष्ट नक्की की 'स्वच्छता तिथेच समृद्धी'. घर व्यवस्थित ठेवल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहते, ज्याचा थेट परिणाम आपल्या कामावर आणि प्रगतीवर होतो.

## भक्ती, श्रद्धा आणि आत्मशुद्धीचा पवित्र दिवस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात एकादशीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वर्षभरात येणाऱ्या चोवीस एकादशींपैकी चैत्र शुक्ल पक्षातील एकादशीला 'कामदा एकादशी' म्हणून ओळखले जाते. 'कामना पूर्ण करणारी' अशी या एकादशीची ख्याती असून, या दिवशी केलेल्या व्रत-उपासनेमुळे भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात, अशी श्रद्धा आहे.

पुराणांनुसार कामदा एकादशीचे महत्त्व अत्यंत विशेष आहे. या एकादशीचे व्रत केल्याने सर्व पापांचा नाश होतो आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग सुकर होतो. विशेषतः पूर्वजन्मी किंवा या जन्मात नकळत झालेल्या पापांपासून मुक्ती मिळवण्यासाठी हे व्रत फलदायी मानले जाते. कामदा एकादशीशी संबंधित एक पौराणिक कथा प्रचलित आहे. एका गंधर्व दांपत्याची ही कथा असून, एका शापामुळे पती राक्षस बनतो. त्यातून मुक्त होण्यासाठी पत्नीने कामदा एकादशीचे व्रत केल्यावर तिच्या पतीला शापातून मुक्ती मिळते. या कथेतून या व्रताचे महत्त्व आणि श्रद्धेची ताकद अधोरेखित होते.

या दिवशी भक्त उपवास करतात, भगवान विष्णूंची पूजा करतात आणि दिवसभर नामस्मरण व भजनात रममाण होतात. काही जण निर्जल उपवास करतात, तर काही फळाहार घेतात. उपवासासोबत मन, वाणी आणि कर्म यांची शुद्धता राखणेही तितकेच महत्त्वाचे मानले जाते. आजच्या धावपळीच्या जीवनात कामदा एकादशीसारखे सण आपल्याला आत्मचिंतनाची संधी देतात. हा दिवस केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित न ठेवता, आपल्यातील वाईट प्रवृत्ती दूर करून चांगल्या विचारांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरणा देतो. कामदा एकादशी म्हणजे श्रद्धा, संयम आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा दिवस. या दिवशी केलेली प्रार्थना आणि उपासना मनःशांती देऊन जीवन अधिक आनंदी आणि समाधानकारक बनवते.

## पैशांची सारखी अडचण का येते?

### स्वयंपाकघरातील 'या' ५ चुका आजच टाळा.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जर तुम्हाला वारंवार आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असेल, तर वास्तुशास्त्रानुसार तुमच्या स्वयंपाकघरात काही बदल करणे महत्त्वाचे आहे.

**सकारात्मक उर्जा**

स्वयंपाकघर हे माता अन्नपूर्णा आणि लक्ष्मीचे स्थान मानले जाते. येथील सकारात्मक ऊर्जा घरात पैसा आणि समृद्धी टिकवून ठेवते.

**रात्रीची खरकटी भांडी**

रात्री जेवलेली खरकटी भांडी बेसिनमध्ये तशीच ठेवल्याने नकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करते. वास्तुशास्त्रानुसार रात्री खरकटी भांडी बेसिनमध्ये ठेवू नका. यामुळे लक्ष्मी माता नाराज होतात.

**रिकामा मिठाचा डबा**

किचनमध्ये मिठाचा डबा कधीही पूर्णपणे रिकामा होऊ देऊ नका. मीठ हे राहूच्या दोषांपासून संरक्षण करते आणि घरातील बरकत टिकवून ठेवते.

**नळाचे टपकणारे पाणी**

जर तुमच्या किचनमधील नळ टपकत असेल, तर ते गंभीर आर्थिक नुकसानाचे लक्षण मानले जाते. यामुळे घरातील पैसाही विनाकारण खर्च होतो.

**ओटा अस्वच्छ ठेवणे**

स्वयंपाक केल्यावर ओटा तसाच घाण ठेवल्याने अन्नाचा अपमान होतो. अस्वच्छ ओटा राहू-केतूचे दोष वाढवतो. ज्यामुळे कुटुंबातील सदस्यांच्या प्रगतीत अडथळे येतात.

**औषधे किचनमध्ये ठेवणे**

वास्तुशास्त्रानुसार किचनमध्ये औषधे ठेवल्याने घरातील सदस्यांचे आजारपण वाढते आणि बराच पैसा औषधोपचारावर खर्च होतो.

# 'मना सज्जना... भेटवी राघवासी'

**मना सज्जना...!**



**मना वासना चूकवी येरझारा।**
**मना कामना सांडि रे द्रव्यदारा।**
**मना यातना थोर हे गर्भवासी।**
**मना सज्जना भेटवी राघवासी ॥ २१ ॥**

श्लोक २० मध्ये आपण 'माया, आसक्ती, दुःख' यावर विचार केला. मनाचे कार्य समजून घेतले. आता त्यापुढील टप्पा म्हणजे 'मनाला योग्य दिशा कशी द्यावी?' येथे समर्थ वासना आणि कामना यांचा संग धरल्याने होणारी हानी लक्षात आणून देतात. वासना आणि कामना हे दोन्ही शब्द जवळजवळ समानार्थी वाटतात परंतु दोघांचे अर्थ मूलतः वेगळे आहेत. कामना म्हणजे एखादी इच्छा, आकांक्षा किंवा अपेक्षा. ती सामान्यतः जाणीवपूर्वक असते, नैसर्गिक असते आणि तिच्यात सकारात्मकताही असू शकते. उदा.- ज्ञानाची कामना, यशाची कामना, समाजसेवेची कामना. म्हणजेच कामना ही इच्छेची स्वच्छ, सजग आणि कधी कधी उदात्त रूप आहे. तर वासना म्हणजे तीव्र, अनियंत्रित आणि बहुतेक वेळा इंद्रियसुखाशी संबंधित इच्छा. ती अनेकदा अवचेतनातून येते आणि विवेक नष्ट करते झाकोळून टाकते. उदा.- भोगवासना, लोभ, अति मोह.म्हणजेच वासना ही इच्छेची आसक्त, आंधळी आणि नियंत्रित न राहणारी अवस्था आहे. थोडक्यात फरक असा संयमित, जाणीवपूर्वक, कधी उदात्त असे तर ती कामना. असंयमित, आंधळी, इंद्रियप्रधान असेल तर ती वासना. समर्थांच्या शैलीत सांगायचे झाले तर 'इच्छा जर विवेकाने चालली तर ती कामना, आणि विवेक हरवला की तीच इच्छा वासना बनते.' म्हणून आपण इच्छांचा त्याग करायचा का? तर नाही नाही. परंतु विवेकाच्या मार्गाने त्यांना योग्य दिशा द्यायची.

**मना वासना चुकवी येरझारा..**

वासना या पंचमहाभूता मधील वायू यांचे रूप आहेत. जीव गेल्यावर देखील त्यांचे अस्तित्व टिकून राहते. ह्या अतृप्त वासना जिवाला पुन्हा पुन्हा जन्माला घालतात. गर्भावस्थेतील यातना भोगायला लावतात. म्हणून जन्ममरणाच्या या येरझारा टाळणेच योग्य. श्रीमदभगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायात कर्मयोग विशद करताना एक श्लोक येतो तो असा...

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥**

कामना, आसक्त इच्छा हीच पुढे क्रोधाचे रूप धारण करते. ती रजोगुणातून उत्पन्न होणारी, कधीही न भरून येणारी अशी हानी करते .

**इच्छा असेल शुद्ध जरी,**
**तीचि कामना होय खरी।**
**विवेक सोडुनी धाव करी,**
**वासना म्हणती तिला॥**

विवेकाची गरज योग्य-अयोग्य यातील फरक ओळखणे यासाठी असते. रजोगुण आधिक्य झाले की काम, क्रोध हे रिपू सबल होतात. मन आणि बुद्धी ही देहरूपी रथाची दोन चाके आहेत. त्यांना वासना, कामनारूपी फुरफुरणारे, आपल्या टाचा उंचावून उधळणारे अश्व जोडले आहेत. हे अश्व विवेकाचे लगाम घालून नियंत्रित केलेले आहेत. विवेकरूपी कुशल सारथी हातातील लगाम जराही सैल सोडत नाही. त्याने ओढून धरलेले बंध त्यांना नियंत्रणात ठेवून आहेत. हे नियंत्रित सुटले की हे अश्व सैराट सुटतात मग रथाचे व्हायचे तेच होते. मग विवेकाची वाट कशी धरावी? तर ईश्वराचे नामस्मरण करून.

समर्थ मनाला संबोधत असताना पुन्हा या श्लोकात म्हणतात...

**मना सज्जना भेटवी राघवासी...**

येथे अत्यंत आर्जवी शब्दातून समर्थ मनालाच आवाहन करतात, की 'बाबारे तूच आता प्रभु रामचंद्रांची भेट घडवुन आणावी.'

जेणे कारणे वासना कामना यांच्या चक्रातून सुटका होईल. यासाठी विवेकाने राघवाला शरण जाणे शिवाय तरणोपाय नाही.

**समर्थ मनोबोध करताना म्हणतात,**
**दुर्लभ शरीर दुर्लभ आयुष्य । याचा करू नये नास ।**
**दास म्हणे सावकाश । विवेक पहावा ।**
**न पहाता उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक ।**
**अविवेके प्राणी रंक । ऐसा दिसे ॥**
**पुढे बजावतात,**

विवेकाचा लाभ घडे । जेणे परमात्मा ठाई पडे ।
विवेक पहाता सापडे । विवेकी जनी ॥

**जय जय रघुवीर समर्थ!**

**- भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : 94203 89541**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)